जाक्र/शिउसं/पुवि/प्राथ. /२०१६ / ६५-८२/८४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दिनांक :- ११/०४/२०१६

प्रति,

प्राचार्य (सर्व)
कायम विनाअनुदानित/अनुदानित/अल्पसंख्यांक इंग्रजी माध्यम व बोर्डाच्या
इतर सर्व माध्यमाच्या शाळा

विषय : फी रेग्युलेशन अॅक्ट २०११ या कायदयाची अंमलबजावणी करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये फी रेग्युलेशन अॅक्ट २०११ हा कायदा डिसेंबर, २०१४ पासून लागू झालेला आहे. सदर कायदयाची अमलबजावणीबाबत इंग्रजी माध्यमाच्या शाळाकडून दखल घेतली जात नाही, अशा पालकांच्या तक्रारी या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या आहेत. तरी कायदयाची अमलबजावणी सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळांना व इतर सर्व शाळांना बंधनकारक आहे. तरी खाली नमूद केल्याप्रमाणे कायदयातील तरतुदीचे पालन होणे आवश्यक आहे.

१) फी वाढ दोन वर्षातून एकदा करण्यात येईल.

२) ज्या शाळांनी फी वाढ पीटीएच्या परवानगीने केलेली नाही, त्या शाळांतील सन २०१५-१६,२०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील फी वाढ गैर समजण्यात येईल. तरी सर्व शाळांनी फी वाढ, फी मान्यतेचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी/ प्रशासन अधिकारी यांचेमार्फत शिक्षण उपसंचालक यांचेकडे पाठवावेत व फी वाढीतील बदल फी मंजूर करुन घ्यावे. सदर फीवाढ प्रस्तावामध्ये प्रमाणित ऑडीट स्टेटमेंट, बॅलेन्सशिट (सनदी लेखापालाकडून) इत्यादी कागदपत्रे सादर करावीत, व नफेखोरी होवू नये.

३) फी बदलाबाबत मंजुरीसाठी पी टी ए चा ठराव सादर करावा, ज्या ठरावामध्ये ऑडीट बॅलेन्सशिट पॅरेन्टस् जनरल बॉडीने तपासले आहे असा समावेश असावा. पीटीएने तपासले आहे, बॅलन्सशीट नेटवर टाकावे.

४) फी वाढ मंजूर प्रस्ताव दि. ३०एप्रिल, २०१६ पूर्वी मंजूर करुन घ्यावे.

५) सदर फी वाढ मंजुरीचे आज्ञापत्र शाळांना प्राप्त होताच शाळांनी ते स्वत:च्या वेबसाईटवर अपलोड करावे.

६) सन २०१५-१६, २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात फी रेग्युलेशन अॅक्ट नुसार फी घ्यावी. त्यास विभागीय समितीची स्थापना होईपर्यंत उपसंचालकांची मान्यता घ्यावी.

..२

७) पी टी ए ची निवड करताना कायदयाप्रमाणे पारदर्शक पध्दतीने व्हावी, निवडीचे वेळी शासनाचा अधिकारी उपस्थित ठेवावा. याप्रमाणे पीटीए ची निवड न झाल्यास पीटीए अवैध ठरविण्यात येईल.

८) फी च्या कारणावरुन पाल्यांचा निकाल अडवू नये व कोणत्याही प्रकारचा त्रास देवू नये.

**(रामचंद्र जाधव)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:**

१) मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) मा. शिक्षण संचालक(प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
३) मा. शिक्षण संचालक(माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी:**

१) शिक्षण प्रमुख, पुणे महानगरपालिका, शिक्षण मंडळ.
१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे
२) प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ